C. S. (M) 2011

**Serial No.** F-DTN–L–SAD–M

# MARATHI

**(Compulsory)**

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

## INSTRUCTIONS

*Candidates should attempt **ALL** questions. The number of marks carried by each question is indicated at the end of the question.*

*Answers must be written in **Marathi** (Devanagari Script) unless otherwise directed.*

*Prescribed word limit must be followed for Q. No. 3.*

*The precis must be attempted **only** on the special precis sheets attached to this question paper.*

*These precis sheets are to be carefully detached from the question paper and securely attached to the answer book.*

---

1. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा (कमीत कमी **300** (तीन शे) शब्द) :— 100

(अ) राजकारण आणि नीतीमत्ता.

(ब) सामाजिक विकासाचे प्रमुख स्रोत कोणते ? धर्म किंवा विज्ञान.

(क) सर्वांसाठी आहार : आमच्या लोकशाही पद्धतीला एक आव्हान.

(ड) जलद संस्कृती धांदल आणि अपराधवृत्तीला जन्म देते.

(इ) कृत्रिम हुशारी; मानव बुद्धीचा पर्याय.

2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे संक्षिप्त, सुस्पष्ट व बरोबर असावीत :— 6×10=60

औद्योगिकरणाच्या वेगवान टप्प्यातून आपण सध्या वाटचाल करीत आहोत. या उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात लोकांना रोजगारही मिळवून देत आहोत. सध्या भारतात एक अशी भावना निर्माण होत चालली आहे की तुम्हाला जे विशिष्ट काम करायचे आहे त्याविषयी तुमचे ज्ञान कितपत आहे याला महत्त्व नसून तुम्ही कोणाला ओळखता, ज्याच्या प्रभावाचा वापर करून काम मिळविता येईल. उत्तम परिणाम मिळविण्यासाठी गुणवत्ता आवश्यक असते हा विचारच लोकांनी सोडून दिला आहे. आपल्या शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता जोपासण्याला निश्चितच महत्व आहे. त्यामुळे जर गुणवत्ता जोपासण्याला महत्व दिले गेले नाही तर गुणवत्तेचा अनादर होतो. यामुळे एकीकडे आमची शिक्षण पद्धती दूषित होते तर, दुसरीकडे सामाजिक चळवळीला वेग देणाऱ्या इच्छेची घुसमट होते.

जेव्हां एखाद्या पुलाचे बांधकाम होते किंवा एखादा रस्ता बनविण्यात येतो तेव्हां वाळू, सिमेंट, चूना इत्यादींच्या योग्य मिश्रणासाठी काही एक निश्चित अनुपात ठरविण्यात येत असतो. ज्यामुळे पूल आणि रस्ता यांचे बांधकाम भक्कम होऊन ते दीर्घकाळ टिकावे. परंतु, आपला अनुभव या विषयात अध:पतनाचीच कथा सांगतो. आपण धरणाला तडा गेल्याचे किंवा पावसाळ्यात रस्ते वाहून गेल्याचे ऐकतो.

हा विषय गुणवत्ता नियंत्रणाचा असून याचा संबंध फक्त साधन-सामग्रीशी निगडीत नसून माणूस आणि त्याच्यातील बांधिलकीच्या जाणिवेशी आहे.

दुर्दैवाने लोकशाही पद्धतीतून अशी परिस्थिती निर्माण होते ज्यामुळे गुणवत्तेला जाणीवपूर्वक डावलले जाते आणि लोक म्हणतात की या देशात गुणवत्तेला काहीच महत्व नाही. त्यामुळे सतत एक

भावना निर्माण होते की इथं योग्यता, कार्यक्षमता आणि <u>नीतीमत्तेवर</u> भर न देता पण कोणतेही जाहीर पद प्राप्त करता येते आणि लोकसेवेचे काम करता येते.

**प्रश्न :**

(अ) चांगला रोजगार मिळविण्यासाठी देशातील लोक कसा विचार करतात ?

(ब) गुणवत्तेचा आदर करणे आपण केव्हां सोडून देतो ?

(क) गुणवत्तेचा अनादर केल्याचे काय दुष्परिणाम होतात ?

(ड) इतरांच्या बांधिलकीच्या जाणिवेची उपेक्षा केल्यामुळे काय होते ?

(इ) योग्यता, कार्यक्षमता, आणि जबाबदारी यांची उपेक्षा कोणत्या कारणांमुळे होते ?

(फ) उताऱ्यातील अधोरेखित वाक्यांचे तुमच्या शब्दात अर्थ लिहा.

3. पुढील उताऱ्याचा सारांश अंदाजे—**190** ते **210** शब्दांमध्ये लिहा. यासाठी दिलेल्या वेगळ्या पानांचा वापर करा. सारांश शब्दसंख्येच्या सीमेत नसेल तर तुमचे गुण कमी केले जातील. सारांश **150** शब्दांपेक्षा कमी किंवा **250** शब्दांपेक्षा अधिक असल्यास अजीबात गुण दिले जाणार नाही :— 60

मी साधारणपणे सात वर्षांचा असेन जेव्हां मांझे वडील राजस्थानिक न्यायालयाचे सदस्य होण्यासाठी पोरबंदर सोडून राजकोटला आले. ते दिवस आणि मला शिकविणाऱ्या शिक्षकांची नावे आणि इतर तपशील अजूनही मला नीट आठवतात. पोरबंदरप्रमाणेच इथेही माझ्या अभ्यासाच्या बाबतीत विशेष काही घडले नाही. मी एक साधारण विद्यार्थी होतो. इथल्या शाळेतून मी एका उपनगरीय शाळेत दाखल झालो आणि तिथून हायस्कुलात गेलो. तेव्हां मी

बारा वर्षांचा झाला होतो. मला नाही आठवत की या अल्पावधीत मी कधीही माझ्या शिक्षकांशी किंवा सहविद्यार्थ्यांशी खोटं बोललो होतो. अतिशय लाजाळू असल्यामुळे मी कोणातही फारसा मिसळत नव्हतो. पुस्तके आणि त्यातील धडे हेच माझे खरे मित्र होते. वेळेवर शाळेत जाणे आणि शाळा सुटल्यावर घरी पळून येणे ही माझी रोजची सवय होती. मी खरोखरच पळ काढत असे कारण मला कोणाशीही बोलता येत नसे. कोणीतरी माझी टिंगल-खाळी करेल याचीही मला भिती असायची.

हायस्कूलच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेच्या दरम्यान घडलेली एक घटना महत्वाची आहे. शिक्षण निरीक्षक मि. जाईल्स पाहणी करण्यासाठी आले होते. शुद्धलेखनासाठी त्यांनी आम्हाला पाच शब्द लिहायला दिले. त्यातील एक शब्द होता 'Kettle'. हा शब्द मी चुकीचा लिहिला. माझ्या शिक्षकांनी मला पायातील जोड्याने खुणावून तो शब्द दुरुस्त करायला सांगितले. पण मला ते मान्य नव्हते. हे मला पटण्यासारखे नव्हते की मी माझ्या शेजारच्या विद्यार्थ्याच्या पाटीवरून तो शब्द पाहून लिहावा. कारण मला तर सतत हेच वाटत असे की शिक्षक आम्हाला 'कॉपी' करण्यापासून परावृत्त करण्यासाठीच तिथे होते. याचा परिणाम असा झाला की मला सोडून इतर सर्व मुलांनी लिहिलेला प्रत्येक शब्द अचूक होता. मीच बावळट ठरलो. नंतर शिक्षकांनी घरी जाताना मला माझा बावळटपणा निदर्शनास आणून दिला. पण त्याचा माझ्यावर काहीच परिणाम झाला नाही. 'कापी' करण्याची कला मी कधीच शिकलो नाही.

असे झाले असले तरीही माझ्या मनात शिक्षकांबद्दलचा आदर काही कमी झाला नाही. दुसऱ्यांच्या अवगुणांकडे मी जात्याच दुर्लक्ष करीत असे. नंतर या शिक्षकांचे इतर अनेक अवगुण कळण्यात आले.



(Contd.)

तरीही त्यांच्याबद्दलचा आदर पूर्ववतच राहिला. याचे कारण हे होते की मी शिकलो होतो, ते मोठी माणसे जे सांगतील ते करायचे, त्यांच्या कृतींना तपासणे नाही.

याच काळातील इतर दोन घटनां देखील माझ्या मनावर कोरलेल्या आहेत. शाळेतील अभ्यासपुस्तकांव्यतिरिक्त काहीही वाचणे मी नेमाने डावलीत असे. रोजचा अभ्यास तर रोजच करावा लागे कारण मला शिक्षकांकडून शिक्षा मिळणे तर आवडत नसेच पण त्यांना बनविणेही आवडत नसे. त्यामुळे मी रोजचा अभ्यास फारसे मन न लावताही करीत असे. रोजचा अभ्यासच नीट होत नव्हता त्यामुळे अवांतर वाचनाचा तर प्रश्नच नव्हता. मात्र वडिलांनी विकत घेतलेल्या एका पुस्तकावर एकदा माझी दृष्टी पडली. ते पुस्तक होते 'श्रवण पितृभक्ती नाटक' (श्रवणाचा त्याच्या आई-वडिलांबद्दल असलेला आदर या विषयाचे नाटक) ते नाटक मी मन:पूर्वक वाचले. याच काळात आमच्याकडे भटके कलावंत आले. त्यांनी मला दाखविलेल्या चित्रांपैकी एक चित्र होते—आपल्या अंध आई-वडिलांना कावडीतून तीर्थयात्रेस नेणाऱ्या श्रवणाचे. ते पुस्तक आणि चित्र या दोहोंचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. मी स्वत:लाच म्हणालो "याचे अनुकरण करायला हवे". श्रवणाच्या मृत्युनंतर त्याच्या आई-वडिलांचे रुदन आजही मानस-पटलावर जागे आहे. ती वेदना माझ्या मनावर खोलवर रुजली. ती चाल मी वडिलांनी विकत घेतलेल्या एका वाद्ययंत्रावर वाजविली होती.

4. खालील उताऱ्याचे **मराठीत** भाषांतर करा :— 20

Tulasidas's imagery covers a vast range. No poet of medieval period — not even his great contemporary Surdas — can vie with Tulasidas in respect of the infinite variety of imagery employed by him. He has collected

his images from peasant life, court life, priestly environments, rural and civic life, philosophical treatises, literary classics, mythological works and folk literature. His poetry is a vast gallery of all kinds of images ranging from exquisite miniature paintings to large frescoes. Normally he likes simple and integrated images, but is quite capable of creating complex imagery as well. What he seems to abhor is a truncated image of which we can hardly search out a single example. His whole poetic creation is an endless endeavour to give a concrete tangible form to the abstract — to impart physical charms and mental qualities of human personality to an absolute concept. Actually the very conception of Personified Godhood is a grand exercise in image-making. In this context, what is of special relevance to the modern reader in Tulasidas's art is his unconventional approach to literary-cultural tradition and religion. A number of poets in other Indian languages have also produced great literature in this regard, but Tulasi appears to have surpassed them all.

5. खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा :— 20

हे सर्वविदितच आहे की जगाची निर्मिती, वाढ आणि संरक्षण प्रकृतीवरच निर्भर आहे. प्रकृतीच्या निर्मितीत व संरक्षणात झाडे-झुडुपे, वन, वेली, गवत-पातींचे फार महत्व आहे. वस्तुत: माणसाचे अस्तित्वच वृक्ष-वन यावर निर्भर आहे. वृक्षच मातीचे मुख्य संरक्षक आहेत. ते वादळाचा वेग अडवून मातीला उध्वस्त होण्यापासून वाचवतात. वृक्ष डोंगरांचे कोसळणे थांबवितात. व त्यांना स्थिर ठेवतात. वनामुळेच पशु-पक्षींचे सांगोपन होते. व पर्यावरणाचे जतन होते. पाऊस पडण्यालाही

वृक्षच कारणीभूत ठरतात. जिथे झाडे जास्त तिथे पाऊस जास्त. वाळवंट मात्र पाऊसासाठी आसुसलेले असतात. पाऊसामुळेच अन्न-धान्य पिकते व अन्न-धान्यामुळे माणूस जगतो. झाडांची पाने खाऊन गुरे-ढोरे जगतात. झाडांमुळेच आम्हाला सरपण व घरांसाठी लाकूड मिळते. रेलवे, होड्या, विमान या सारख्या दळण-वळणाच्या साधनांच्या निर्मितीत झाडांपासून मिळालेल्या लाकडाचा वापर होतो. वेगवेगळी औषधे, डिंक, कागद, काड्यापेटी, कितीतरी प्रकारचे तेल, पौष्टिक फळे इत्यादींचा न संपणारा ठेवा ही झाडेच आहेत. वृक्षाची गार सावली आपणास तळपत्या उन्हापासून विसावा देते. फुलांचा सुगंध आपल्या मनाला ताजेपणा देतो.

6. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :— 5

(i) हात दाखवून अवलक्षण

(ii) कंबर कसणे

(iii) आयत्या बिळावर नागोबा

(iv) आपला तो नाब्या आणि दुसऱ्याचं ते कार्टं

(v) करावे तसे भरावे

(vi) ऐकावे जनाचे करावे मनाचे

(vii) उथळ पाण्याला खळखळाट फार

(viii) नाचता येईना अंगण वाकडे.

(आ) पुढीलपैकी **एका** विषयावर वृत्तपत्रात प्रसिद्ध करव्यासाठी **20** वाक्यांच्या मर्यादित पत्र लिहा :— 5

(i) पत पेढ्यांचे राजकारण

(ii) वाहनांची वाढती संख्या आणि वाहतुकीचे नियम

(iii) शालेय पातळीवर मराठीची स्थिती.

(इ) पुढीलपैकी कुठल्याही **एका** कल्पनेचा विस्तार **15** वाक्यात करा.:— **10**

(i) इकडे आड तिकडे विहीर

(ii) दिसामाजी काहीतरी ते लिहावे

(iii) ठेविले अनंता तैसेचि असावे.

(ई) पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **15** वाक्यांचा संवाद लिहा :— **10**

(i) इंटरनेट आणि भाषा

(ii) एस एम एस ची भाषा

(iii) माहितीचा अधिकार.

(उ) पुढील कवितेचे **15** वाक्यात रसग्रहण करा :— **10**

ओळखलंत का सर मला,
पावसात आला कोणी.
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला बोलला वरती पाहून;
गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून.
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली.
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली.
भिंत खचली चूल विझली होते नव्हते गेले.
प्रसाद म्हणुनी पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले.
कारभारणीला घेऊन संगे, सर आता लढतो आहे.
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे.
खिशाकडे हात जाता हसत हसत उठला,
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला.
मोडून पडला संसार पण मोडला नाही कणा,
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा !

Sr. No. 

**F–DTN–L–SAD–M**

अपना अनुक्रमांक इन पत्रकों पर न लिखें

DO NOT WRITE YOUR ROLL NO. ON THESE SHEETS

# MARATHI
# (Compulsory)

सार लेखन के लिए विशेष पत्रक

**SPECIAL SHEETS FOR PRECIS**

**इस पत्रक के दोनों ओर लिखिए। प्रत्येक खण्ड में एक शब्द और प्रत्येक पंक्ति में पांच शब्द लिखिए। अपने उद्धरण में सामान्य रूप से विराम आदि चिन्ह लगाइए और यदि आवश्यक हो तो प्रत्येक पैराग्राफ के अन्त में एक पंक्ति खाली छोड़ते हुए इसे पैराग्राफों में विभक्त कीजिए। यदि चाहें तो उत्तर-पुस्तिका के साधारण कागज पर पहले एक कच्चा प्रारूप तैयार कर सकते हैं। अपनी उत्तर-पुस्तिका दे देने से पहले कच्चे कार्य को आर-पार पंक्ति डालकर काट दिया जाना चाहिए। आप सारपत्रक को अपनी उत्तर-पुस्तिका के अन्दर सुरक्षित रूप से बांध दीजिए।**

**Use both sides of this sheet. Write one word in each division and five words in each line. Punctuate your passage in the usual way and divide it into paragraphs, if necessary, leaving a line blank at the end of each paragraph. You may make a rough copy first, if you so wish, on ordinary paper in the answer-book. The rough work should be scored through before you hand over your answer-book. You should fasten the precis sheet securely inside your answer-book.**

| शीर्षक<br>Title | | | | | इस हाशिए<br>में न लिखें<br>Do not write on<br>this margin |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

[कृ.पृ.उ./P.T.O.]

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | 70 |
| | | | | | 80 |
| | | | | | 90 |
| | | | | | 100 |
| | | | | | 110 |
| | | | | | 120 |
| | | | | | 130 |
| | | | | | 140 |
| | | | | | 150 |
| | | | | | 160 |
| | | | | | 170 |
| | | | | | 180 |

190

200

210

220

230

240

250

260

270

280

290

300